Estd : 1962
NAAC 'A++' Grade with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## EPABX सिस्टिमसाठी वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणीकरिता दरपत्रक सूचना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये अंतर्गत Telephone EPABX सिस्टिम संभाषणासाठी कार्यरत आहे. सदर सिस्टिमसाठी सन २०२४—२५ मध्ये वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणीसाठी दरकरार करावयाचा आहे. याबाबतच्या नियम व अटी सोबत जोडल्या आहेत. तरी यासाठी दरपत्रके नियम व अटीसहीत सिलबंद लखोटयातून **मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नांवे दि. **२६/०४/२०२४ पूर्वी** पाठवावे. सदर लखोट्यावर **"EPABX सिस्टीमसाठी वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणीसाठी दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

उपकुलसचिव

जा. क्र. शिवाजी वि./सीडीओई/ /२०२४—२५
दिनांक : - 4 APR 2024 140

## Telephone ईपीबीएक्स सिस्टीमच्या वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणीसाठी नियम व अटी

**• सन २०२४—२५ •**

१) सदरचा वार्षिक दरकरार हा लागू केलेल्या दिनांकापासून एक वर्षासाठी राहील.

२) सदर कालावधीत Telephone EPBX देखभाल करण्यासाठी आपला अधिकृत इंजिनियर किमान महिन्यातून एकदा पाठविणेचा आहे.

३) Telephone EPBX सिस्टीममधील उद्भवलेल्या समस्याचे निराकरण करण्यासाठी कार्यालया—कडून बोलावणे आल्यानंतर २४ तासाचे आत कार्यालयीन वेळेत येणे बंधनकारक आहे.

४) वार्षिक दर करारानुसार देखभाल व दुरूस्ती जास्तीत जास्त दोन दिवसात पूर्ण करून देणे आवश्यक आहे. याबाबतची पूर्तता होत नसल्यास तसे कार्यालयास कारणासह सत्वर लेखी स्वरूपात कळविणे बंधनकारक राहिल.

५) सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करारामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

अ. वार्षिक दुरूस्ती विनामुल्य

ब. पुरक साधने बदलून देणे

क. सामान्य उपयोगातून दोष/दुरूस्ती निर्माण झाल्यास पूर्ण करणे.

६) देखभाल कराराच्या रक्कमेतील ५०% रक्कम ही करार लाभ झालेनंतर अदा करण्यात येईल.

७) वार्षिक देखभाल कराराची उर्वरीत रक्कम ही कामाचा अहवाल पाहून सहा महिन्यानंतर अदा करण्यात येईल.

८) वार्षिक देखभाल दुरूस्ती कामाचा अहवाल असमाधानकारक आल्यास उर्वरीत रक्कम अदा केली जाणार नाही व सदरचा करार आपोआप संपुष्टात येईल / रद्द होईल.

९) दरपत्रकात सादर केलेले दर हे सर्व करासहीत असून ते मला बंधनकारक राहतील.

१०) वार्षिक देखभाल करारामध्ये नैसर्गिक आपत्तीतून — भूंकप, महापूर, अतिउच्च, कमी जास्त व कमी विद्युत दाब या कारणास्तव उद्भवलेली समस्यांची दुरूस्ती करणे व भाग बदलून देणे बंधनकारक नाही.

११) वार्षिक देखभाल दुरूस्तीकरिता येणाऱ्या प्रतिनिधीला कार्यालयाकडून जागा, विद्युत पुरवठा व टेबल खुर्चीची व्यवस्था करण्यात येईल.

१२) वार्षिक देखभाल करार हा एक वर्षापर्यंत बदलता येणार नाही.

१३) वार्षिक देखभाल करारामध्ये काही वाद—विवाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय विद्यापीठ प्रशासनाचा राहील.

१४) वरील नियम व अटीचे पालन करून वार्षिक देखभाल करार करण्यास तयार असणे आवश्यक आहे.

उपकुलसचिव
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर